## रे.मु.नं. १२०/२०२० मधील निशाणी ५ वरील अंतरिम एकतर्फा आदेश

**१.** वादीचा निशाणी ५ वरील अर्ज व त्यासोबत दाखल केलेले शपथपत्र वाचले. वादीतर्फे वकील श्री. आर.ई. काळे यांनी असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही वादी यांची खरेदी मालकी हक्क वहीवाटीची मिळकत असून सदर मिळकतीच्या सात बारापत्रकी वादींची मालक म्हणून नोंद झालेली आहे. प्रतिवादी यांचा सदर मिळकतीशी कोणताही हक्क हित संबंध नसतांना प्रतिवादी क्र. २ व ३ हे प्रतिवादी क्र. १, ४ ते ७ यांच्याशी संगनमत करून अनाधीकाराने वाद मिळकतीत बांधकाम करून अतिक्रमण करण्याच्या प्रयत्नात आहेत. पुढे वादीच्या कथनानुसार सध्या प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी दाव्यासोबत जोडलेल्या कच्च्या नकाशात पिवळया व लाल रंगाने दाखवल्याप्रमाणे क्षेत्रात अर्जदाराने बांधकाम करण्याकरिता पाया खोद काम करून फाउंडेशन बांधलेले आहे. सदर बाधकामाबाबत यातील वादीने दि. २०/०८/२०२० रोजी प्रतिवादी क्र. २ व ३ यांना नोटीस पाठवली असून सदर नोटीसीस उत्तर दिनांक २५/०८/२०२० रोजी पाठवुन प्रतिवादींनी बांधकाम चालु ठेवलेले आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांच्या विरूध्द अतिक्रमण क्षेत्राचा ताबा मिळण्याबाबत तसेच मॅनडेटरी व परमनंट मनाई करीता दाखल केलेला आहे.

**२.** वादींनी दाव्यासोबत दावा मिळकतीचे सात बारा उतारा, फेर क्र. ५२९८,५८८१,१५९७७,१६३१५,१६२९३,१६१४९, २१३९७, २११५४, १६४४४, १७११२, १७१६८,१७२३२,१७८६० चे उतारे, वादीचे दिनांक ०६/०७/२०१८ रोजीचे खरेदीखत, दि. २०/०८/२०२० ची नोटीस व त्यावरील दि. २५/०८/२०२० रोजीचे उत्तर इत्यादी कागदपत्रे तसेच वाद मिळकतीबाबतचे फोटो दाखल केलेले आहेत. प्रथमदर्शनी वादींच्या दाव्यातील कथन व सोबत दाखल केलेले कागदपत्रे पाहता वाद मिळकतीमध्ये वादीच्या नावे ०.०३.०२ आर क्षेत्र खरेदी मालकीने नोंद असल्याचे व सदर मिळकतीमध्ये प्रतिवदी क्र. २ व ३ हे बांधकाम करीत असल्याचे दिसून येते. सदर प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे बांधकाम वाद मिळकतीत अतिक्रमण करून केले आहे किंवा कसे या मद्दयावर वादी–प्रतिवादी यांचे म्हणणे घेवुन, दोन्ही बाजू सविस्तरपणे ऐकूण गुणदोषांवर निर्णय देणे न्यायाच्या दृष्टीणे आवश्यक आहे. वादीचे नि. ५ चे तुर्तातुर्त ताकीद अर्जावर दोन्ही बाजूंचे म्हणणे दाखल होवून गुणदोषांवर सदरचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज निर्गत करणे गरजेचे

आहे. मात्र त्या दरम्यान प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी त्यांचे बांधकाम चालु ठेवल्यास दाव्याच्या कामी गुंतागुंत निर्माण होवुन दावा मिळकतीचे वस्तुस्थितीत बदल होण्याची शक्यता आहे. सबब वर नमूद परिस्थिती विचारात घेवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**–:आदेश:–**

१. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी दाव्याचे कामी समन्स बजावून हजर होवुन आपले म्हणणे–कैफियत दाखल करे पर्यत वाद मिळकतीची परिस्थिती ''जैसे थे'' ठेवण्यात यावी.

२. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी वादीचे निशाणी ५ वरील तुर्तातुर्त ताकीद अर्जावर दाव्याचे अंतिम निर्णयापर्यंत मनाई हुकूम पारित करण्यात का येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस काढण्यात यावी.

३. वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३९ रूल ३ प्रमाणे आवश्यक ती पूर्तता करावी.

४. अर्जंट प्रोसेस फी व स्पेशल बेलीफ भत्ता मंजूर करण्यात येतो.

**सही/–**
(पी. व्ही. सपकाळ)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
जामखेड.

दिनांक: २१/०९/२०२०